**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (पालघर जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ६८/२०१९** **दिनांक २३/०८/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,** विभाग प्रमुख, कृषिविदया विभाग ९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,** नोडल ऑफिसर, कृषिविदया विभाग ९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,** तांत्रिक अधिकारी कृषिविदया विभाग ८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक १७/०८/२०१९ ते २३/०८/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २४/०८/२०१९ सकाळी ८:३० पासून २८/०८/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७/०८ | १८/०८ | १९/०८ | २०/०८ | २१/०८ | २२/०८ | २३/०८ | | २४/०८ | २५/०८ | २६/०८ | २७/०८ | २८/०८ |
| ६.० | २.० | ७.० | ०.० | २.० | ०.० | ९.४ | पाऊस (मिमी) | ७ | ६ | २६ | २३ | ३० |
| ३०.६ | ३०.६ | ३०.८ | ३१.० | ३१.० | ३१.० | ३०.६ | कमाल तापमान (अं.से) | ३२ | ३० | ३० | ३१ | ३१ |
| २५.४ | २६.२ | २६.० | २५.६ | २५.० | २५.४ | २५.२ | किमान तापमान (अं.से) | २५ | २५ | २६ | २६ | २६ |
| १ | ० | ० | २ | २ | १ | १ | मेघाच्छादन (ऑक्टा) | ७ | ८ | ८ | ७ | ६ |
| ९४ | ९४ | ८७ | ८९ | ९४ | ८२ | ८५ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ८२ | ८३ | ८२ | ८१ | ८३ |
| ८२ | ८३ | ७२ | ७३ | ७४ | ८४ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ६६ | ६९ | ७२ | ७१ | ७३ |
| ७.० | ५.८ | ३.७ | ३.३ | ३.१ | ४.२ | २.९ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १३ | १६.५ | १६.३ | १८.९ | १९.७ |
| आ.पु. | इ. | पु. | इ. | शांत | पू. | प. | वाऱ्याची दिशा | द. | नैे.द. | द. | नै. | नै.द. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| २६.४ | २७८२.२ | २३५९.६ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक २४ ते २८ ऑगस्ट २०१९ पर्यंत मध्यम स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश ढगाळ राहिल.**

**दिनांक १६ ते २२ ऑगस्ट, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा कमी राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **फुटवे अवस्था** | • भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी.पर्यंत नियंत्रित करावी.<br>• पुढील पाच दिवस ढगाळ वातावरण असून पाउसाची उघडीप असण्याची शक्यता असल्यामुळे पाणथळ भागात लावलेल्या भात पिकावर पाणी साठून राहिल्यामुळे निळे भुंगेरेचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने पिकाचे सातत्याने निरीक्षण करून किडीच्या प्रादुर्भावाकडे लक्ष ठेवावे. किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही ४० मि.ली. किंवा ट्रायझोफॉस ४० टक्के प्रवाही १२.५ मि.ली. किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ५ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| **आंबा** | **पालवी** | • वाढत्या तापमानामुळे आंब्याला पालवी फुटण्यासाठी पोषक वातावरण तयार होत असून पालवीचे किडी आणि रोगांपासून पासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. + बाविस्टीन २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **चिकू** | **फलधारणा** | • चिकूमध्ये बुरशीजन्य रोगामुळे फळगळ होत असल्याने नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी.<br>• चिकूच्या १ वर्षाच्या प्रती कलमास ५ किलो शेणखत, १५० ग्रॅम युरिया, ४५० ग्रॅम सिंगल सुपर फोस्फेट आणि १५० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटश खतांचा पहिला हप्ता कलमाच्या विस्ताराच्या थोडीशी आत बांगडी पद्धतीने चरात देवून चर बुजवून घ्यावा. पहिल्या वर्षी दिलेल्या खताच्या मात्रेच्या दुसऱ्या वर्षी दुप्पट, तिसऱ्या वर्षी तिप्पट या प्रमाणे वाढवून २० वर्षा पर्यंत २० पात खताचा हप्ता द्यावा. २० वर्षानंतर प्रती कलमास १०० किलो शेणखत, ३ किलो युरिया, ९ किलो सिंगल सुपर फोस्फेट आणि ३ किलो म्युरेट ऑफ पोटश खतांचा पहिला हप्ता देण्यात यावा. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**